बिगर यांत्रिकी मच्छिमार नौका बांधण्यासाठी देण्यात
येत असलेल्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.मत्स्यवि-१०९९/प्र.क्र.१६/पदुम-१२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांकः-१ जुलै ,१९९९.

पहाः- शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग क्र.मत्स्यम-१६८१/३९७३१/१२,पदुम
दि.९ सप्टेंबर, १९८२.

प्रस्तावनाः-

परंपरागत पध्दतीने मासेमारी करणाऱ्या व आर्थिक दृष्टया अत्यंत दुर्बल असलेल्या लहान मच्छिमारांना किंवा रापणकरांना त्यांच्या मत्स्योत्पादनात वाढ व्हावी तसेच त्यांची आर्थिक स्थिती सुधारावी या हेतुने १० टनापर्येन्तच्या बिगर यांत्रिक नौका (तिच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या शीड, वल्ही, नांगर व दोर यांसह) बांधण्याकरिता किंवा अशा तयार नौका खरेदी करण्याकरिता प्रकल्प खर्चाच्या (बोटीच्या किंमतीच्या) ५० टक्के किंवा रुपये ३०,०००/- (रु.तीस हजार फक्त) यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देण्याविषयीची योजना शासन निर्णय,कृषि व सहकार विभाग, क्रमांक-मत्स्यम-१६८१/३९७३१/१२ पदुम, दिनांक ९ सप्टेंबर,१९८२ अन्वये कार्यरत करण्यात आली आहे.

२. १९८२ साली १० टन वजनापर्यतच्या बिगर यांत्रिकी नौकेची किंमत, इतर सर्व साहित्यासह रु.६०,०००/- (रु.साठ हजार फक्त) ग्राहय धरुन अनुदानाची वरील मर्यादा निश्चित करण्यात आली होती. गेल्या १७ वर्षाच्या कालावधीत नौका बांधण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या व कुशल कारागिरांच्या मजुरीच्या दरात बरीच वाढ झाल्यामुळे दारिद्रय रेषेखालील मच्छिमारांना प्रचलित दराने उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून नौका बांधणे शक्य होत नाही. सद्यः स्थितीत अशी नौका बांधण्यासाठी सुमारे रु.१.०० ते १.२५ लाखाचा खर्च येतो. यास्तव बिगर यांत्रिकी मच्छिमार नौका बांधण्यासाठी देण्यात येत असलेल्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णयः-**

वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन याबाबतीत शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१) १० टनापर्यन्तच्या बिगर यांत्रिक नौका बांधण्यासाठी किंवा अशी तयार नौका खरेदी करण्यासाठी सद्याच्या प्रचलित दराने रु.३०,०००/- (रु.तीस हजार फक्त) पर्यन्त देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा वाढवून रु.६०,०००/- (रु.साठ हजार फक्त) पर्यन्त करण्यात येत आहे.

२) अर्थात सदरचे अनुदान बोट बांधण्यासाठी/खरेदी करण्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के अथवा रु.६०,०००/- (रु.साठ हजार फक्त) यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान अनुज्ञेय राहील.

३) सदर अनुदान लाकडी बोटीबरोबरच फायबर ग्लास बोटीकरिता देखिल अनुज्ञेय राहील.

४) अनुज्ञेय सुधारित अनुदानाच्या मर्यादेत मच्छिमारांनी बांधलेल्या/विकत घेतलेल्या बोटींचे यांत्रिकीकरण करावयाचे असल्यास, त्यासाठी शासनाची परवानगी असेल. यामुळे यापूर्वी यांत्रिकीकरणासाठी विहित करण्यात आलेली ७ वर्षाची अट रदद करण्यात येत आहे.

२. सुधारित निकषावर आधारित प्रस्तुतची योजना राबविताना शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग, क्रमांक-मत्स्यम-१६८१/३९७३१/१२ पदुम-दिनांक ९ सप्टेंबर १९८२ सोबत जोडलेले परिशिष्ट-ब आता रदद करण्यात येत असून, यासाठी योजना कार्यान्वित करणे व इतर अटी व शर्तीचा तपशील या शासन निर्णयासोबत जोडलेल्या सुधारित परिशिष्ट-ब समाविष्ट करण्यात आला आहे.

३. सदर योजना राबवितांना त्याकरिता वार्षिक योजनेत उपलब्ध नियत व्ययाच्या मर्यादेतच अनुज्ञेय लाभार्थीना अनुदान मंजूर करण्यात यावे. यावरील खर्च

(अ) मागणी क्रमांक-डी-७

२४०५-मत्स्यव्यवसाय

८०० इतर खर्च

८०० (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना

८०० (एक) मच्छिमारी साधने

(ए) राज्य योजनांतर्गत योजना-(२४०५ ०४४ २)

(ब) मागणी क्रमांक-डी-७

२४०५,मत्स्यव्यवसाय
८०० इतर खर्च
८०० (दोन) (दोन) मच्छिमारी साधने
८०० (डी) विशेष घटना योजना-(२४०५ ०६५६)

या लेखाशिर्षाखालील त्या त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हे आदेश नियोजन विभागाच्या आणि वित्त विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४३९/९८/व्यय-१,दिनांक ३१.८.१९९८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सहपत्र-परिशिष्ट-ब

(र.हि.पिंपळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

प्रति,
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट राज्य, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सहसंचालक, लेखा व कोषागरे,संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन,
५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-१/अर्थसंकल्प-१५/अर्थसंकल्प-३)
प्रत,
मा.मुख्यंमत्र्याचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य
मा.मंत्री (पदुम) महाराष्ट्र राज्य
मा.राज्यमंत्री (पदुम) महाराष्ट्र राज्य

मा.सचिव, भारत सरकार, कृषी मंत्रालय (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग) कषि भवन, नवी दिल्ली
मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव महाराष्ट्र राज्य मुंबई
मा.अतिरिक्त मुख्य सचिव (मदत व पुर्नवसन) मंत्रालय, मुंबई
अवर सचिव (पदुम-१६) कक्ष अधिकरी, पदुम-१२, पदुम-१३ निवडनस्ती)

परिशिष्ट-ब

## बिगर यांत्रिकी मच्छिमार नौका बांधण्यासाठी देण्यात येत असलेल्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत.

शासन निर्णय, कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक-मत्स्यवि-१०९९/प्र.क्र.१६/पदुम-१२,दिनांक १ जुलै,१९९९ चे सहपत्र.

**प्रस्ताविक**:-

सदर अर्थसहाय्याचा प्रधान हेतू गरीब मच्छिमारांना बिगर यांत्रिक नौकांसाठी अनुदान मिळावे हा आहे. असे अनुदान मिळत असल्यामुळे मच्छिमारांना बँकेतून कर्ज मिळणे सोपे जाईल.

**अनुज्ञेय बाबी:-**

१० टनापर्यन्त (कौलावरील टनेज) असलेल्या बिगर यांत्रिक नौका (तिच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या शीड, वल्ही, नांगर, दोर यांसह) बांधण्याकरिता किंवा तयार नौका विकत घेण्याकरिता खालीलप्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. (जाळयांसाठी अर्थसहाय्य मिळणार नाही.)

**अनुदानाचे प्रमाण:-**

१) शासनाचे अनुदान बोट बांधणी/खरेदी किंमतीच्या ५० टक्के अथवा रु.६०,०००/- (रु.साठ हजार फक्त) यापैकी जे कमी असेल तेवढे.
२) बँकेकडून घेतलेल्या कर्जाची नियमित फेड केल्यास व तशी बँकेने शिफारस केल्यास बँकेचा सामान्य व्याज दर व द.सा.द.शे.रु.४/- प्रमाणे व्याजदर या मधील फरका एवढे व्याज अनुदान शासनाकडून मिळेल.

**अर्थसहाय्य मिळण्यासाठी आवश्यक बाबी:-**

१) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न एकात्मिक ग्रामीण विकास योजनेमार्फत अनुदान मिळण्यास पात्र उत्पन्न मर्यादेपर्यत असावे.

२) अर्जदाराने पूर्वी यांत्रिक अगर बिगर यांत्रिक नौकांसाठी अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा. असल्यास त्याच्या हिश्याची अनुदानाची रक्कम परत केलेली असावी.

३) तसेच अर्जदाराने मत्स्यव्यवसाय विभागाकडून घेतलेले सर्व कर्ज व्याजासह चुकते केलेले असावे.

**अर्थसहाय्य मिळविण्याची पध्दतः-**

अर्जदाराने आपल्या अर्जाच्या ३ प्रती संबंधित मच्छिमार सहकारी संस्थांच्या शिफारशीसह सहायक मत्स्यव्यवसाय संचालक/जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात. अर्जात नौका व अन्य साधनांसाठी किती रक्कम लागणार आहे व कर्ज कोणत्या बँकेकडून घेणार याचा तपशील बँकेकडून घेणार याचा तपशील द्यावा. सदर अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीतः-

अ) संबंधित तालुक्यातील तहसिलदार अथवा गट विकास अधिकारी यांच्याकडून अर्जदाराच्या एकूण वार्षिक उत्पन्नाचा दाखला.

ब) संस्थेचा सभासद व मच्छिमार असल्या संबंधिचा संस्थेचा दाखला.

क) नौका बांधणीचा करारनामा.

ड) शीड,वल्ही, नांगर,दोर यांची निविदा.

संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक/जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांच्या कार्यालयातील अधिकारी या अर्जाची नोंद आवक दिनांकनुसार नोंदवहीत घेतील.

सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक/जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांच्या कार्यालयातील अधिकारी उपलब्ध निधी, अर्जाचा प्राथम्य क्रमांक, तो विभागाचा थकबाकीदार नाही इत्यादी गोष्टी लक्षात घेवून अर्जदाराने नमूद केलेल्या, बँकेकडे कर्जाची शिफारस करतील. अशी शिफारस करताना संबंधित कार्यालय बँकेच्या नजरेस विभागातर्फे किती अनुदान देण्यात येईल एवढेच नमूद करील व तसे अर्जदाराला कळवील. बँकेकडून कर्ज मिळविण्याची जबाबदारी अर्जदारावर राहिल.

**अटः-**

अनुदान प्राप्त बिगर यांत्रिक नौका अनुदान दिल्यापासून सात वर्षाच्या कालावधीत हस्तांतरीत करता येणार नाहीत अथवा विकता येणार नाही.

**अनुदानाचे वितरणः-**

१) बोट बांधणी/खरेदी किंमतीच्या ५० टक्के किंवा रु.६०,०००/- (रु.साठ हजार फक्त) हयापैकी जी कमी असेल ती अनुदानाची रक्कम नौका बांधणीसाठी ज्या बँकेकडून कर्ज घेतला जाणार आहे, त्या बँकेने कर्ज मंजूर केल्यावर ज्या सहकारी संस्थेमार्फत अर्ज असेल त्या सहकारी संस्थेच्या नावे जिल्हा बँकेत जमा करण्यात येईल.

२) अर्जदाराने प्रतिवर्षी बँकेच्या कर्जाचे हप्ते तसेच व्याज नियमितपणे बँकेकडे भरणा करावेत. सदरहू कर्जावरील ४ टक्के दराने होणारी व्याजाची रक्कम बँकेने कर्जदाराकडून प्रतिवर्षी वसूल करावी व नियमित दराप्रमाणे होणारी उर्वरित व्याज रक्कम चुकती करण्यासाठी बँकेच्या संबंधित जिल्हा कार्यालयास आपले मागणी पत्र वर्षा अखेर पाठवावे. त्यानुसार व्याज अनुदानाची रक्कम बँकेकडे भरणा करण्यात येईल.